E-file

**किरकोळ फौजदारी अर्ज नं– ४५९/२०२६** **निशाणी ०१ पुरवणी**

**तक्रारदाराचे सत्यापन**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो/करते की,**

**नाव :** दयालसिंग तारुमल चंदानी,

**वय : ९३** वर्षे, **व्यवसाय :** सुखवस्तू,

**रा. :** निगडी प्राधिकरण, पुणे

**शपथेवर सत्यापन –**

**०१.** १० ते १५ वर्षापूर्वी वर्तमान पत्रामध्ये गट नं.१५६३ चिखली, ता. हवेली याबाबत तहसीलदार यांनी जाहिर नोटीस काढली होती. त्यामध्ये सोनवणे व शेलार यांनी गट नं.१५६३ या मिळकतीचे एकूण क्षेत्र ९हे. ३३आर. यामध्ये बेकायदेशीररित्या मुरुम व दगड याची उत्खनन करुन विक्री चालू केली होती त्यासंदर्भात तहसीलदार यांनी त्यांच्यावर दंड आकारला होता व दंड न भरु शकल्यामुळे सदर मिळकतीचा लिलाव काढणेबाबत जाहिर नोटीस होती. त्यामध्ये मी सर्वात जास्त बोली म्हणजे २९,६०,०००/– या रकमेची बोली लावल्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी सदर मिळकतीची खरेदी माझ्या नावे अंतिम केली होती. त्याप्रमाणे तहसीलदार यांनी सदर खरेदी खतासंदर्भात प्रमाणपत्र दिले. मंडल अधिकारी तालुका भूमी अभिलेख यांच्यामार्फत मोजणी होवून हद्दी निश्चीत करुन त्याबाबतचा पंचनामा करुन मला सदर मिळकतीचा ताबा देण्यात आला. सोनवणे यांचा सदर गट नं.१३३ गुंठे होते व शेलार यांचा ६७ गुंठे असे एकुण २ हेक्टर क्षेत्र होते. सोनवणे यांनी मला ताबा दिला होता, परंतु शेलार यांनी ताबा देण्यास अडथळा केल्यानंतर पोलीसांच्यासमोर मंडल अधिकारी यांनी पंचनामा करुन मला ताबा दिला. सदरची मिळकत ही रेड झोन मध्ये असल्यामुळे संपूर्ण मिळकत ही मोकळी होती. सदर मिळकतीस आम्ही कच्चे कंपाऊंड लावलेले होते व येवूनजावून पाहणी करत होतो. दोन वर्षापूर्वी माझा मुलगा सदर मिळकतीमध्ये गेला होता तेव्हा त्याने पाहिले की, शेलार याचे जे क्षेत्र आम्ही घेतले होते त्यावर शेलार व गुप्ता नावाची एक व्यक्ती यांनी बांधकाम सुरु केले होते, तसेच आगरकर नावाची एक व्यक्ती शेड बांधत होती. माझ्या मुलाने त्यांना त्याबाबत विचारले असता गुप्ता याने सदरची मिळकत ही शेलार यांनी त्याला दिलेली आहे व त्याबाबत त्यांच्यामध्ये करार झालेला आहे असे सांगितले व त्याने शेलार यांना बोलावले, त्यावेळी शेलार येताना सोबत सात ते आठ मुले घेवून आला. त्याने माझ्या मुलाला दमदाटी केली व त्याला धमकी दिली की तू येथून निघून जा नाहीतर तुला मारुन टाकेन. तसेच गुप्ता याने माझ्या मुलाकडे एक करोड रुपयांची मागणी केली व म्हणाला की, तुम्ही जर मला पैसे दिले तर मी निघून जाईल. त्याबाबत माझ्या

Jadhadik
1-8-202

**E-file**

मुलाने व्हीडीओही काढलेला आहे. तसेच माझ्या मुलाला म्हणाला तुमची मालकी नाही, या मिळकतीवर माझी मालकी आहे. त्यानंतर माझ्या मुलाने कागदपत्रे दाखवली असता गुलाबराव शेलार व मधुकर शेलार यांची मुले म्हणाली ज्यांनी तुम्हाला कागद दिलेले आहेत त्यांना दाखवा, मला दाखवू नका व इकडे येवू नका. तसेच ते म्हणाले की, मी सरकारच्या कोणत्याही आदेशाला मानत नाही. तुम्हाला जे काय करायचे आहे ते करा. शेलार यांनी धमकी दिल्यामुळे आम्ही आमच्या दुसऱ्या मिळकतीमध्येही जाण्यास घाबरत आहोत. आरोपीविरुध्द कठोर शासन व्हावे अशी माझी इच्छा आहे.

**सत्यापन पूर्ण.**

......................

**फिर्यादीची सही**

Mahadik
1-8-2026

**दि. ०१/०८/२०२६**

**ठिकाण– पिंपरी**

**(टी.एस.महाडीक)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी**